महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३९ /२०२४ दि. ०६/०८/२०२४

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी, नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०७/०८/२०२४ रोजी मा. श्री. सी. पी. राधाकृष्णन राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तसेच मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री श्री अजित पवार, विधान परिषद उप सभापती सौ. निलम गोन्हे व मंत्री मंडळातील मंत्री, खासदार, आंमदार तसेच अनेक मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने राम गणेश गडकरी नाटयगृह येथे **'योध्दा कर्मयोगी पुस्तकाचे प्रकाशन'** कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) पु. ना. गाडगीळ कडून ग्रिन लिफ मार्गे गडकरी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ग्रिन लिफ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने पु. ना. गाडगीळ चौक – ग्रिन लिफ हॉटेल – डॉ. मुस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) डॉ. मुस चौक कडून गडकरी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साईकृपा हॉटेल ग्रिन लिफ हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हॉटेल साईकृपा कडून – एस. बी. आय कट – राम मारूती रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) डॉ. मुस चौक कडून गडकरी सर्कल कडे येणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना (बस/एस.टी) यांना **डॉ. मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** स्टेशन कडून येणारी जड अवजड (बस/एस.टी) वाहने डॉ. मुस चौक मार्गे टॉवर नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) टॉवर चौक व गडकरी सर्कल येथून डॉ. मुस चौक कडून गडकरी रंगायतन मार्गे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गडकरी सर्कल मार्गे दगडी शाळा अल्मेड किंवा गजानन महाराज चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पार्किंग मनाई :–** १) चिंतामणी चौक ते गडकरी सर्कल तलावाची बाजू व सेंट जॉन स्कूलचे पाठीमागील रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

२) गजानन महाराज चौक ते गोखले रोड पर्यंत राम मारूती रोडवर दोन्ही बाजूस वाहनांना पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) साईकृपा हॉटेल ते एस. बी. आय. कॉर्नर संपूर्ण रोडवर दोन्ही बाजूस वाहनांना पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दि. ०७/०८/२०२४ रोजी दुपारी १४:०० ते २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मुंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.

CamScanner